# Lilavati Hospital and Research Centre

*More than Healthcare, Human Care*



**पुण्य नगरी**

# मुलांना होतोय स्पायना बिफिडाचा त्रास

## आईतील फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे होते समस्या

**मुंबई** : आईतील फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे जन्माच्या वेळी अनेक मुलांमध्ये स्पायना बिफिडाचा त्रास लहान मुलांमध्ये निर्माण होतो. यात पाठीला गाठ, मेंदूत पाणी, पॅरॅलिसीस आणि शौच व मूत्रावरील नियंत्रण जाणे, असे प्रकार घडतात. त्यामुळे वयाच्या १२ वर्षांपर्यंत मुलांच्या ४ ते ५ शस्त्रक्रिया कराव्या लागतात, त्यामुळे पालकांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे गरोदरपणाच्या आधी फॉलिक ॲसिड मात्रा सुरू करणे गरजेचे असते. मात्र, अजूनही याबाबत जनजागृती नसल्याने १००० पैकी ४ ते ५ मुलांना स्पायना बिफिडाची समस्या निर्माण होत आहे.

स्पायना बिफिडामध्ये पाठीचा मणका आणि मेरुदंड व्यवस्थित विकसित होत नाही. त्यामुळे मुलाच्या विकासात अडचणी येतात. अनेकवेळा या आजाराबाबत माहिती नसल्यामुळे व मुलांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने याचे वेळीच निदान व उपचारात अडचणी येतात. त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत वाढते. स्पायना बिफिडाच्या वाढत्या प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेता लीलावती रुग्णालयाच्या बालरोग शस्त्रक्रिया विभागाने स्पायना बिफिडा फाऊंडेशनच्या सहकार्याने ३० जानेवारी २०२४ रोजी रुग्णालयात मोफत शिबिराचे आयोजन केले आहे.

महाराष्ट्रासह देशभरात स्पायना बिफिडा (जन्मदोष) या आजाराची प्रकरणे वाढत आहेत; परंतु या आजाराबाबतच्या अज्ञानामुळे ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मुलांना वेळेत उपचार मिळत नाहीत. हा अनुवांशिक आजार नसून गर्भधारणेच्या सुरुवातीला आईमध्ये फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे मुलामध्ये ही समस्या उद्‌भवते. यामुळे बाळाला कायमचे अपंगत्व, विकृती, दैनंदिन कामासाठी इतरांवर अवलंबून राहणे आणि जीवनाची गुणवत्ता कमी होणे अशा समस्यांचा सामना करावा लागतो.

स्पाइना बिफिडा हा पाठीच्या कण्यासंबंधित जन्मजात दोष आहे, ज्यामुळे बालपणातच पक्षाघात (पोलिओपेक्षा गंभीर) होतो आणि भारतात दरवर्षी ४०००० पेक्षा जास्त मुले या जन्मजात दोषाने जन्माला येताना पहायला मिळतात. स्पायना बिफिडा हा भारतातील सर्वात सामान्य जन्मजात दोष आहे आणि जगात त्याची सर्वाधिक घटना आढळून येतात. भारतात दरवर्षी १००० बालकांपैकी स्पाइना बिफिडाची ४-५ प्रकरणे आढळतात. विकसित जगातील बहुतेक भागांमध्ये दर १००० पेक्षा कमी आहे. फॉलिक ॲसिड सप्लिमेंट्स घेण्याबाबत जनजागृतीचा अभाव हा या स्थितीला कारणीभूत ठरणारा एक प्रमुख घटक आहे. बहुतेकदा, महिलांना त्यांच्या गर्भधारणेबद्दल माहिती नसते आणि म्हणूनच पुरश्या प्रमाणात फॉलिक ॲसिड सप्लिमेंट्स घेतले जात नाही. या व्यतिरिक्त, अनेक गर्भधारणा अनियोजित असतात, ज्यामुळे स्त्रिया अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि फॉलिक ॲसिड पूरक आहार घेणे टाळतात. अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि फॉलिक ॲसिड पूरक आहाराच्या सेवनाने स्पायना बिफिडा प्रकरणे ८० टक्के टाळता येते.

### स्पायना बिफिडाबाबत?

स्पायना बिफिडा ही एक अशी स्थिती आहे जी पाठीच्या कण्याला प्रभावित करते आणि सामान्यत: जन्माच्या वेळी या स्थितीचे निदान होते. हा एक प्रकारचा न्यूरल ट्यूब डिफेक्ट आहे. गर्भधारणेदरम्यान किंवा बाळाच्या जन्मानंतर स्पिना बिफिडाचे निदान केले जाऊ शकते. अशक्तपणा, पायाचा अर्धांगवायू, आकडी येणे, पायांमधील विकृती, असमान नितंब आणि मूत्राशयाच्या समस्या ही स्पायना बिफिडाची लक्षणे आहेत.

Smart Mumbai Edition Jan 19, 2024 Page No,.2